# मुलींच्या शिक्षणावर आधारित नाटक पाहण्याची संधी

**पुणे :** मुलींच्या शिक्षणावर आधारित सोंगटी या नाटकाचा प्रयोग पाहण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळणार आहे. पंख सामाजिक संस्था व क्विकहिल फाऊंडेशनच्या शाळांगण प्रकल्पा अंतर्गत कै. बाबुराव सणस कन्याशाळा, मंगळवारपेठ शुक्रवारी दुपारी ३ वाजता नाटकाचा प्रयोग होणार आहे. मराठी अभिनेत्री माधवी सोमण व अंजली धारू या हा प्रयोग सादर करणार आहेत. नुकतीच सावित्रीबाई फुले यांची जयंती झाली त्यानिमीत्त नाटकाचा विषय हा मुलींच्या शिक्षणावर आधारित असेल, आजच्या युगात मुलींचे शिक्षण किती महत्वाचे आहे व कितीही खडतर जीवन वाट्याला आले तरी संघर्ष करून गरीब घरातील सोंगटी शिक्षण पूर्ण करून कशी स्वतःच्या पायावर उभी राहते,हे नाटकातून दाखविले जाणार आहे. असे संयोजकांकडून सांगण्यात आले आहे.